## <u>भुसंपादन निर्देशन दरखास्त क्र.०६/२०२१ मध्ये निशाणी क्र.९ कडील अर्जावर आदेश.</u>

१) प्रस्तुतचा अर्ज न्यायनिर्णीत धनकोतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६, नियम १७ मधील तरतुदीनुसार दाखल केला आहे.

२) न्यायनिर्णीत धनको यांच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार ऋणको क्र. २ अरुणावती कॅनल विभाग, यवतमाळ यांचे कार्यालय यवतमाळ येथून बंद झाले आहे व सदर कार्यलयाचे विलीनीकरण अरुणावती प्रकल्प विभाग, दिग्रस, तालुका–दिग्रस, जिल्हा–यवतमाळ येथे झाले आहे. प्रस्तुत अर्जात अशी विनंती केली आहे की, ऋणको क्र. २ च्या नावामध्ये अरुणावती नावासमोर कॅनल ऐवजी प्रकल्प व यवतमाळ ऐवजी दिग्रस, तालुका–दिग्रस अशी दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी.

३) प्रस्तुत अर्जास प्रतिपक्षाने म्हणणे द्यावे असा आदेश केला आहे. परंतु नोटीसची बजावणी होवूनही ऋणको क्र. १ व ४ हे या कामी हजर झाले नाहीत व त्यांनी या अर्जास म्हणणे दिले नाही व त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज ऋणको क्र.१ व ४ यांच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्याबाबतचा आदेश पारीत केला आहे.

४) प्रस्तुत अर्जाच्या कामी न्यायनिर्णीत धनको यांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) न्यायनिर्णीत धनको यांच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार ऋणको क्र. २ अरुणावती कॅनल विभाग, यवतमाळ यांचे कार्यालय यवतमाळ येथून बंद झाले आहे व सदर कार्यालयाचे विलीनीकरण अरुणावती प्रकल्प विभाग, दिग्रस, तालुका–दिग्रस, जिल्हा–यवतमाळ येथे झाले आहे. या अनुषंगाने निशाणी क्र.१२ खालील बेलीफ रिपोर्टचे अवलोकन करता असे दिसून येते की, बेलीफाच्या रिपोर्टनुसार नोटीसमधील बनाम नामे कार्यकारी अभियंता,

अरुणावती कॅनल विभाग, यवतमाळ यांच्या कार्यालयाचा तपास केला असता तेथील कर्मचाऱ्यांनी सांगितले की, ते कार्यालय दिग्रस येथे आहे व त्यामुळे नोटीसची बजावणी करता आली नाही. निशाणी क्र. १२ खालील बेलीफ रिपोर्ट विचारात घेता माझ्या मते न्यायनिर्णीत धनको यांनी न्यायनिर्णीत ऋणको क्र. २ यांच्या नावामध्ये प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणेची प्रस्तावीत दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याची केलेली विनंती न्यायाच्या दृष्टीने मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. न्यायनिर्णीत धनको यांनी प्रस्तुत अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणेची योग्य ती दुरुस्ती दरखास्तच्या टायटल क्लॉजमध्ये या आदेशाच्या दिनांकापासून १४ दिवसाच्या आत करावी व त्यानंतर दुरुस्त दरखास्तची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. या अर्जाचा खर्च ज्याचा त्याने सोसण्याचा आहे.

४. वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

स्वाक्षरी/-

दिनांकः- २७/०१/२०२२ (पां.लिं.घुले)

ठिकाणः- दारव्हा दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,दारव्हा.